**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र.एमओएम/३६९ दि.२७.०६.२०२५

विषय:- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचारी/अधिका-यांनी त्यांचे नाव, पदनाम यांचे फलक लावण्याबाबत.

बृहन्मुंबई महानगरपालिका ही नागरिकांना दर्जेदार सेवा देणारी संस्था आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग/खाते यांच्या अखत्यारित अनेक विभाग कार्यरत असतात. हया विविध विभाग/खात्यांद्वारे दिल्या जाणा-या सेवांशी संबंधित कर्मचारी/अधिकारी त्यांचे नाव व पदनाम या बाबींची माहिती नागरिकांना अवगत करणे आवश्यक आहे. जेणेकरुन सेवा प्राप्त करुन घेण्याकरिता/माहिती घेण्याकरिता येणा-या नागरिकांना संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्याशी थेट संपर्क साधता येईल व त्यांचा वेळ वाया जाणार नाही.

तथापि, काही विभाग/खात्यांत तसेच नागरी सुविधा केंद्रात संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या नावाची व पदनामाची पाटी केबिन वर लावलेली नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याची पत्रे व ई-मेल प्राप्त होत आहेत.

नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्याकरिता व संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्याशी थेट संपर्क साधणे सुलभ व्हावे याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व खाते/विभाग प्रमुख यांना खालील निदेश देण्यात येत आहेत.

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व खाते/विभाग प्रमुख यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांना नाव व पदनाम यांचे फलक लावण्यात यावेत अशा सूचना दयाव्यात.

२) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयात ज्या ठिकाणी नागरी सुविधा केंद्रे कार्यरत आहेत तेथील कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांचे नाव व पदनामाचे फलक लावण्याची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना प्रमुख लेखापाल (वित्त) यांनी संबंधितांना दयाव्यात.

३) सर्व खाते/विभाग प्रमुख व प्रमुख लेखापाल (वित्त) यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांना त्यांच्या नाव व पदनामाचे फलक लावताना परिपत्रक क्र.एमओएम/१०१५ दि.२४.०९.२०२४ मधील निदेशांनुसार फलकावर आईचे नाव देखील अंतर्भूत करण्यात यावे अशा सूचना दयाव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/१३.०५.२०२५ | सही/१५.०५.२०२५ | सही/१३.०६.२०२५ | सही/२०.०६.२०२५ |
| (शारदा गोसावी) | (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त(शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रकअ/१८२
२०२५-२६

सामान्य प्रशासन विभाग
क्र.एमओएम/३६९ दि.२७.०६.२०२५

प्रत-------------------------------------------------------------------------------------यांना

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

कल्याणी नाईक 27.6.25

(श्रीम. कल्याणी नाईक)
रचना व कार्यपद्धती अधिकारी
(आयुक्त कार्यालय)

Scanned with ACE Scanner